## मनोगत

नाटक हा माझा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. अडीच वर्षे वयाचा असताना मी पहिल्यांदा रंगमंचावर पाऊल ठेवले. तो प्रवास आताच्या घडीपर्यंत अविरत सुरू आहे. आमच्या घराण्यातच साहित्य, कला, नाटक, संगीत या आणि अशा अनेक कलांचा भरभरून वास कायमच आम्हाला लाभलेला आहे. अशा कलासंपन्न घराण्यात झालेला माझा जन्म, जन्मजात अंगभूत असलेली संगीत-साहित्य-नाट्य कला आणि जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्याला सर्वार्थाने लाभलेले पोषक वातावरण यांमुळे या सर्व घटकांविषयीची ओढ अधिकच वाढत गेली. कालांतराने औपचारिक शिक्षणाच्या निमित्ताने मराठी साहित्य या विषयाकडे वळल्यानंतर त्याविषयीची जाणीव अधिक समृद्ध झाली. या दरम्यान नाट्यसंहिता वाचन, नाटकांतून अभिनय या गोष्टी समांतरपणे चालूच होत्या. कालांतराने, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातून एम.ए.ची पदवी मिळवल्यानंतर याच विषयाला धरून पीएच्.डी. चे काम करावे असा विचार मनात आला आणि त्या दिशेने कार्य करायला सुरुवात केली. अनेक वर्षे याविषयीचे काम संथगतीने सुरूच होते परंतु 'प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते' या न्यायाने अखेरीस मुहूर्त सापडला तो म्हणजे गोवा विद्यापीठाच्या सेवेत रुजू होण्याचा. गोवा विद्यापीठात सहायक प्राध्यापक पदी रुजू झाल्यानंतर झपाट्याने या कामाची गती वाढली आणि यथाशक्ती, यथामती आकार देण्याचा प्रयत्न केलेला हा प्रबंध आज मूर्त स्वरूपात येत आहे.

या प्रबंधाच्या एकूण प्रवासात अनेकांचे हात, सहकार्य, योगदान लाभले आहे परंतु सर्वप्रथम मी ऋण व्यक्त करू इच्छितो ते म्हणजे माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर यांचे. पहिल्या दिवसापासून ते या घडीपर्यंत सरांनी प्रत्येक छोट्यामोठ्या गोष्टीसाठी स्वत: पुढे येत मदतीचा हात देऊ केला आणि त्यांच्याचमुळे हा प्रबंध आज पूर्णत्वास येत आहे. सरांचे शैक्षणिक, साहित्यिक मार्गदर्शन तर कायमच लाभत आले परंतु त्यापलिकडील अनेक गोष्टींच्या बाबतीत

सरांची मते, त्यांचे विचार यांचाही आदर्श प्रत्येकाने डोळ्यासमोर ठेवावा असाच आहे. कामाविषयीची गंभीरता, सचोटी, निष्ठा, चिकाटी, पूर्णपणे झोकून देऊन काम करणे या गोष्टी सरांकडून कुणीही शिकाव्या अश्या आहेत. आपल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडचणी सोडवण्यापासून ते कामाच्या संदर्भातील तांत्रिक बाबींची व्यवस्था सुनिश्चित करणे इथपर्यंत प्रत्येक गोष्ट सरांनी स्वत:च्या खांद्यावर घेतल्याने मला पूर्णपणे संशोधनावर लक्ष केंद्रित करून हा प्रबंध निर्धारित कालावधीत पूर्ण करणे शक्य झाले. सरांच्या मार्गदर्शनाचा आणि मदतीचा केवळ ऋणनिर्देश करून भागणार नाहीच. त्यांच्या मार्गदर्शनाची आणि आधाराची गरज एक विद्यार्थी म्हणून आजन्म लागणार आहे. त्यामुळे, सदैव त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करेन.

माझ्या आजवरच्या शैक्षणिक वाटचालीत मला ज्यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले त्या माझ्या गुरू डॉ. विद्या प्रभुदेसाई यांचाही मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. मराठी विषयाची माझी एकूणच जाणीव समृद्ध करण्याच्या दिशेने त्यांनी घातलेल्या भक्कम पायामुळेच मला भविष्यातील वाटचाल करणे शक्य झाले. पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. मनोहर जाधव, डॉ. विद्यागौरी टिळक, डॉ. अविनाश सांगोलेकर, डॉ. तुकाराम रोंगटे आणि डॉ. प्रभाकर देसाई या सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

नाट्यक्षेत्रात प्रत्यक्ष रंगमंचावर अभिनय करताना ज्यांचे नाट्यदिग्दर्शन मला लाभले ते माझे सन्मित्र स्व. शशिकांत नागेशकर यांचेही मी कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण करतो. त्यांचा लाभलेला सहवास आणि नाट्यदिग्दर्शनाच्या निमित्ताने नाटकाकडे पाहण्याची त्यांनी दिलेली दृष्टी यामुळे नाटकाचा अनेक इतर अंगांनी विचार करणे शक्य झाले. नाटक हा माझ्याप्रमाणेच त्यांच्यासाठीही श्वासासमान होता. या दिवसाचे साक्षीदार होण्यासाठी आज ते आमच्यात असायला हवे होते परंतु ईश्वरी इच्छेपुढे निरुपाय आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

नाटकाच्या क्षेत्रात संशोधन करायचे म्हणजे नाट्यसंहितांचे संकलन आलेच. त्यातही कोंकणी तियात्र या एका वेगळ्या चौकटीतील संहिता मिळवण्याची माझी धडपड, आमचे मित्र

आणि कृष्णदास शामा गोवा मध्यवर्ती ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल तथा गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयशास्त्र अध्ययनशाखेचे वर्तमान संचालक, डॉ. कार्लुस फर्नांडीस यांनी केलेल्या मदतीमुळे सोपी झाली. नाटकाप्रमाणेच तियात्रांच्या संहिता, संबंधित लेख, संपादित ग्रंथ यासारख्या अनेक संशोधनपूरक गोष्टी त्यांनी स्वत: माझ्यासाठी आपुलकीने जमवल्या आणि उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार. नामवंत गोमंतकीय तियात्र लेखक, अभिनेते आणि दिग्दर्शक तोमाझीन कार्दोज यांची अमूल्य मदत या कामी झाली. स्वत:च्या सर्व तियात्रांच्या संहिता त्यांनी विनाशुल्क आणि अतिशय सहृदयतापूर्वक, शुभेच्छांसह मला भेट दिल्या त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

गोवा विद्यापीठाच्या मराठी अध्ययनशाखेतील माझ्या सर्व सहकाऱ्यांशी झालेल्या प्रासंगिक चर्चेतून प्रस्तुत संशोधनाचे विविध नवे पैलू आणि आयाम प्राप्त झाले आणि त्यातून या संशोधनाला दिशा प्राप्त झाली त्याबद्दल मी त्यांचेही कृतज्ञतापूर्वक ऋण व्यक्त करतो. या संशोधन कार्यासाठी फार मोठ्या प्रमाणात आधार ग्रंथ आणि संदर्भ ग्रंथांची असणारी आवश्यकता पूर्ण करण्यात गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयाने सर्वतोपरी बहुमूल्य मदत केली आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई तसेच त्यांचे सर्व सहकारी यांनी दरवेळी तेवढ्याच उत्साहाने मदत केली त्याबद्दल त्यांचेही आभार.

प्रस्तुत प्रबंधाच्या कार्यात अनेक लेखक-अभ्यासकांच्या ग्रंथांचा संदर्भ म्हणून उपयोग झाला आहे त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. प्रस्तुत प्रबंधाच्या एकूण संशोधन प्रवासात, कुलगुरूनियुक्त विषय तज्ज्ञ तसेच वेळोवेळी संपन्न झालेल्या सहामाही सादरीकरण बैठकांसाठीच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या बहुमूल्य सूचनांमुळेही प्रस्तुत संशोधनाला वेगळी दिशा लाभली त्याबद्दल मी त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

प्रस्तुत पीएच्.डी. संशोधन कालावधीदरम्यान, प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून एकूण तीन संशोधन लेख, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विद्वत्प्रमाणित संशोधन नियतकालिकांतून

प्रसिद्ध झाले आणि यामुळे प्रस्तुत संशोधन कार्याला अधिक बळ लाभले त्याबद्दल संबंधित नियतकालिकांचेही ऋण व्यक्त करतो.

कोणत्याही अभ्यासक/संशोधकासाठी त्याचे कुटुंब हा मोठा आधार असतो. पूर्णवेळ पीएच्.डी. चे संशोधन कार्य करताना कौटुंबिक जबाबदाऱ्यांची विशेष काळजी मला करू न दिलेल्या माझ्या कुटुंबाचेही मी ऋण व्यक्त करतो. माझ्या या संशोधन कार्यासाठी अनेक संस्था, व्यक्ती यांचा हातभार लागलेला आहे. सर्वांचाच उल्लेख करणे या इथे शक्य नाही. अशा सर्व ज्ञात-अज्ञातांचा मी ऋणाईत आहे.

**चिन्मय मधू घैसास**

दिनांक :